महाराष्ट्र शासन (स्थापित)

फोन : २६०५४५१२
२६०५३२१५
फॅक्स : २६०५३२१५

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे
# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

**Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )**

स्थापना : २००३

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

**कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.**

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. /

दिनांक : 6/8/2020

प्रति,

विषय :- <u>सुरक्षा रक्षकांच्या दि. ०१/०७/२०२० पासून देय असलेल्या वाढीव महागाई भत्त्याबाबत.</u>

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मंडळाने पु.जि.सु.र.मं./वेतन/पुर्ननिर्धारण/ठ.क्र.९१/२०१९ अन्वये सुरक्षा रक्षकांचे वेतन पुर्ननिर्धारित केले आहेत. संबंधित आदेशात नमूद केल्याप्रमाणे दि.०१/०७/२०२० ते दि.३१/१२/२०२० या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचा दर मंडळाने निर्धारित केलेला असून, सदरच्या आदेशाची प्रत सोबत जोडून देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व लेव्ही मंडळात ५ तारखेच्या आंत दरमहा अदा करावी.

आपला विश्वासू,

सरकारी कामगार अधिकारी
तथा
सचिव
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ पुणे

Scanned with CamScanner

फोन : २६०५४५
२६०५३२१
फॅक्स : २६०५३२१५

महाराष्ट्र शासन (स्थापित)

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे
# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards
(Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )

स्थापना : २००३

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. /　　　　　　　　　　　　　　दिनांक :

## आदेश

विषय :- पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा महागाई भत्ता दिनांक ०१ जुलै, २०२० पासून करण्यात येणारी सुधारणा.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते व इतर सेवा शर्ती पुर्ननिर्धारित ठराव क्र. ९१/२०१९ निर्धारित केलेले आहे. त्याबाबतचे आदेश दि.१५/०६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये दि. १ एप्रिल, २०१९ पासून वेतन निर्धारित करण्यात आलेले आहे.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२०-१/कार्या-१०/१७८३, दि.०५/०२/२०२० अन्वये दि. १ जानेवारी, २०२० ते दि. ३० जून, २०२० या कालावधीकरीता विशेष भत्ता/महागाई भत्त्यांचा दर रू.४८४६/- दरमहा निश्चित केलेला आहे. तथापि मंडळाने यापूर्वीच सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित केले असल्याने सदरच्या महागाई/विशेष भत्त्यांचे दर दि.३०/०६/२०२० पर्यंत लागू केले आहेत. शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या दि.०५/०८/२०२० रोजीच्या क्र. ग्रा.वि./ कि.वे.अ./ वि.भ./२०२०-२/कार्या-१०/४१९६ अधिसुचनेनुसार ''कोणत्याही दुकानांतील व व्यापारी आस्थापनेतील कामधंदा'' या अनुसुचित उद्योगातील कामगारांचे दि.०१/०७/२०२० ते दि.३१/१२/२०२० या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचे दर रू.९३६/- इतके निर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०७/०६/२०१९ रोजी झालेल्या ठराव क्र.९१/२०१९ नुसार केलेल्या वेतन पुर्ननिर्धारण आदेशात नमूद केल्याप्रमाणे उक्त नमूद अधिसुचना क्र. प्रमाण मानून दि.०६/०८/२०२० रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्त्यांत रू.९३६-७५४= रू.१८२ वाढ करून दि.०१ जुलै, २०२० ते दि. ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीकरीता दरमहा रू.४,८४६ + रू.१८२ = रू.५,०२८/- इतका निश्चित करून जाहिर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(नि.अ. वाळके)
सहायक कामगार आयुक्त
तथा
अध्यक्ष
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ

Scanned with CamScanner

परिमंडळ-१ (सपूर्ण पुणे जिल्हा)

# सुरक्षा रक्षकांच्या वेतन व लेव्हीचा तपशील

शासन आदेश क्र.युडब्ल्यए-२०१४/प्र.क्र.५८३/कामगार-५, दि.०७/११/२०१७ नुसार सुरक्षा रक्षकांना दि.०१/०४/२०१९ पासून सुधारित वेतन व भत्ते.
दि. १३/०६/२०१९ रोजी श्रम एंव रोजगार मंत्रालय निर्गमित केलेली अधिसुचना.

महाराष्ट्र शासनाने दि.०१/०७/२०२० पासून ३१/१२/२०२० या कालावधीकरीता महागाई भत्ता यामध्ये वाढ केल्याने वेतन सुधारित केल्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.
सदर दर किमान वेतन कायदा १९४८ नुसार २६ दिवसांसाठी (८ तासांकरिता) आहेत व त्यात आठवडा सुट्टीचा समावेश आहे.
सुट्टीचे दिवशी सुरक्षा रक्षकांस तैनात केल्यास जादा कामाचा दर दुप्पट दराने राहिल. दि.१/७/२०२० ते ३१/१२/२०२० या कालावधीकरीता.

| | सुरक्षा रक्षक | मुख्य सुरक्षा रक्षक | सुरक्षा पर्यवेक्षक | सहा. सुरक्षा रक्षक अधिकारी | सुरक्षा रक्षक अधिकारी | मुख्य सुरक्षा अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| मूळ वेतन | ७४००.०० | ७५००.०० | ८०००.०० | ८५००.०० | ९०००.०० | ९४००.०० |
| महागाई भत्ता | ५०२८.०० | ५०२८.०० | ५०२८.०० | ५०२८.०० | ५०२८.०० | ५०२८.०० |
| एकूण | १२४२८.०० | १२५२८.०० | १३०२८.०० | १३५२८.०० | १४०२८.०० | १४४२८.०० |
| घरभाडे भत्ता (१५%) | १८६४.२० | १८७९.२० | १९५४.२० | २०२९.२० | २१०४.२० | २१६४.२० |
| शैक्षणिक भत्ता | ११००.०० | ११००.०० | ११००.०० | ११००.०० | ११००.०० | ११००.०० |
| प्रवास भत्ता | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | १०००.०० |
| धुलाई भत्ता | ७००.०० | ७००.०० | ७००.०० | ७००.०० | ७००.०० | ७००.०० |
| एकूण | १७०९२.२० | १७२०७.२० | १७७८२.२० | १८३५७.२० | १८९३२.२० | १९३९२.२० |
| लेव्हीं ४२.५% | ५२८१.९० | ५३२४.४० | ५५३६.९० | ५७४९.४० | ५९६१.९० | ६१३१.९० |
| ३.२५% लेव्हीं घरभाडे व आंतकालोक भत्त्यावर | ६०.५९ | ६१.०७ | ६३.५१ | ६५.९५ | ६८.३९ | ७०.३४ |
| ३.२५% लेव्ही प्रवास भत्त्यावर | ३२.५० | ३२.५० | ३२.५० | ३२.५० | ३२.५० | ३२.५० |
| ३.२५% लेव्ही शैक्षणिक भत्त्यावर | ३५.७५ | ३५.७५ | ३५.७५ | ३५.७५ | ३५.७५ | ३५.७५ |
| एकूण | २२५०३ | २२६६१ | २३४५१ | २४२४१ | २५०३१ | २५६६३ |

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ पुणे

Scanned with CamScanner